**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत आयोजित करण्यात येणा-या "मराठी भाषा दिवस" या कार्यक्रमाच्या खर्चास मंजूरी देणेबाबत**

# मराठी भाषा विभाग

**शासन निर्णय क्रमांक : मभादि-२०१२/ प्र.क्र.१४/२०१२/ भाषा-३,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१२**

**शासन निर्णय** : -

दि.२७ फेब्रुवारी, हा ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस "मराठी भाषा दिवस" म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने कार्यक्रम आयोजित करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास, खालीलप्रमाणे होणा-या **रु. २,९९,०००/- (रुपये दोन लाख नव्याण्णव हजार फक्त)** इतक्या खर्चास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रमाचे स्वरुप | आवश्यक खर्चाची रक्कम |
|---|---|---|
| १. | पु.ल.देशपांडे कला अकादमीमधील मीनी थिएटरचे भाडे (१ दिवस) रु. ७,४२०/- + पुस्तक प्रदर्शन हॉल भाडे (२ दिवस) रु. २२,०८०/- | रु.२९,५००/- |
| २. | मान्यवर अतिथी, प्रमुख पाहुणे यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणे | रु.९,३००/- |
| ३. | निमंत्रण पत्रिका ( छपाई रु.११,०००/- कुरीअर / टपाल खर्च रु.१०,०००/- आणि डिझाईन (श्री.अच्युत पालव रु.१५,०००/-) | रु.३६,०००/- |
| ४. | मान्यवरांचा चहा , नाश्ता | रु.२०,०००/- |
| ५. | कार्यक्रमाचे बॅनर तयार करणे | रु.१३,०००/- |
| ६. | कार्यक्रम पूर्व प्रसिध्दीसाठी पत्रकार परिषद | रु.२,५००/- |
| ७. | निवेदक मानधन (श्री.प्रदीप भिडे) | रु.१५,०००/- |
| ८. | कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र गीत आणि शवेटी पसायदान म्हणणा-या ग्रुपचे मानधन | रु.५,०००/- |
| ९. | कार्यक्रमाचे छायाचित्र | रु.६,०००/- |
| १०. | विशेष व्याख्यात्यांचे मानधन | रु.१०,०००/- |
| ११. | गौरववृत्ती, मानपत्र लिहिणा-यांचे मानधन | रु.५,०००/- |
| १२. | रंगमंच सजावट (व्हीआयपी खुर्च्या, टेबल, समया, फुलांची सजावट, टेबल क्लॉथ, खुर्च्या इचे भाडे | रु.५०,७००/- |
| १३. | पुस्तके प्रकाशनासाठी आवश्यक साहित्य (कागद, रिबीन, प्लॅस्टिक पिशव्या, धनादेशाकरीता पाकिटे इ.) | रु.२,०००/- |
| १४ | प्रमुख पाहुणे / अतिथी प्रवास खर्च, गौरववृत्ती प्राप्त साहित्यिकांना सन्मानपत्र /स्मृतीचिन्ह / प्रवास खर्च (वातानुकुलित शयनयान) | रु.३५,०००/- |
| १५ | "सांख्य" या संस्थेमार्फत कवी कुसुमाग्रजाच्या कवितांवर आधारीत नृत्य नाटिका | रु.५०,०००/- |
| १६ | ग्रंथप्रदर्शन व मराठी भाषा दिवस कार्यक्रमाची जाहिरात | रु. १०,०००/- |
| | **एकूण** | **रु.२,९९,०००/-** |

२.	यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. झेड एफ-०२ , मुख्य लेखाशिर्ष - २२०५-कला व संस्कृती - १०२ , कला व संस्कृती प्रचालन (०१) योजनेतर योजना (०१)(०१) राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदान या खाली सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या मंजूर तरतूदीमधून मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा. प्रस्तुत बाबीसाठी खर्च होणारी रककम संक्षिप्त देयकाद्वारे काढण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना एक विशेष बाब म्हणून मंजूरी देण्यात येत आहे :-

(१)	यापूर्वी संक्षिप्त देयकाद्वारे काढण्यात आलेले रु.३५.०० लाखाचे संक्षिप्त देयक प्रलंबित असल्याने त्याचे तपशीलवार देयक तात्काळ सादर करण्यात येईल.

(२)	या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक विहित मुदतीत (१ महिन्याच्या आत) सादर करण्यात येईल.

(३)	खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

(४)	या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांची राहील.

(५)	मासिक निधी विवरणपत्रानुसार सदर रक्कम खर्च करण्यास उपलब्ध आहे.

३.	हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ७५/१२, विनियम दि. २१.२.२०१२ व अनौपचारीक संदर्भ क्र. १२४/१२, व्यय -४, दि.२२.२.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

(संगणक संकेतांक क्र. २०१२२२१०१६४९०२२७३३)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ल.शि.देठे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई, नागपूर.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७. वित्त विभाग/व्यय - ४ , मंत्रालय, मुंबई, विनियम
८. निवड नस्ती (भाषा-३).
, अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.